IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# 'स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचा विकास'

डॉ. अंकुश मारुती सोहनी
शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय, पाली, सुधागड, जि. रायगड

प्रस्तावना :-

फ्रेंच विचारवंत चार्लस फेरियरच्या मतानुसार "एखाद्या राष्ट्राकडून महिलांना दिल्या जाणाऱ्या सामाजिक व राजकीय महत्त्वावरून त्या राष्ट्राची सांस्कृतिक उंची मोजता येते" याशिवाय महत्त्वाचे म्हणजे महिला याच नवनिर्मित करू शकतात, कारण त्यांना अशी शक्ती रुपी देन बहाल केली आहे की, त्या शक्तीच्या माध्यमातून कुटुंब समाज पर्यायाने राष्ट्राचा कायापालट करू शकतात. म्हणून एका राजकीय विचारवंताने अशी भूमिका मांडली आहे की, "जर एखाद्या देशाची प्रगती मोजावयाची असेल तर त्या देशातील महिलांची स्थिती व दर्जा कसा आहे. त्यांना कोण कोणते अधिकार आहेत.यावरून त्या देशाची प्रगती मोजण्यात यावी."

एकंदरीत कुटुंब, समाज पर्यायाने राष्ट्राच्या विकासात महिलांची भूमिका अत्यंत महत्वाची असल्याचे दिसून येते. हजारो वर्षापासून विशेषता महिला यांचे विविध हक्क विकासाच्या संधी नाकारून त्यांचे जीवन काही धर्ममार्तंडानी बंदिस्त करून टाकले होते. फारशी आर्थिक संसाधने त्यांना उपलब्ध होऊ दिली नाहीत. तशी व्यवस्थाच जाणीवपूर्वक बनवण्यात आली होती. शिक्षणाच्या संधी नाकारल्या होत्या. केवळ "चूल आणि मूल" याच बाबतीत त्यांना बंदिस्त करून टाकलेले होते.

परिणामी महिलांचा विकास झाला नाही. पण साधारणत: १९ व्या शतकात मात्र काही मानवतावादी मंडळीकडून,समाजसुधारकांकडून, संत महात्मे यांच्याकडून स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांना वेगवेगळे अधिकार उपलब्ध करून देण्यासाठी आणि समाजात जनजागृती करण्यासाठी भरीवप्रयत्न झाले आहेत. पण खऱ्या अर्थाने महिलांना विकासाची संधी भारतीय संविधान लागू झाल्यापासून मिळली आहे.

त्यानुसार प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्य उत्तर काळातील महिलांचा विकास कसा घडवून आला आहे . या संदर्भात आढावा घेण्यात आला आहे.

उद्देश :-

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांच्या परिस्थितीचा विचार करणे.
२) स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचा अभ्यास करणे.
३) भारतीय राज्यघटनेतील महिलांच्या संदर्भातील विविध तरतुदींचा अभ्यास करणे.
४) महिलांचा सामाजिक , राजकीय आर्थिक व धार्मिक बाबींचा अभ्यास करणे.

शोध निबंधाची व्याप्ती:-

प्राचीन व मध्ययुगातील महिलांचे स्थान त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांनी केलेल्या विकासासंदर्भात प्रस्तुत शोधनिबंधात आढावा घेतला आहे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सामाजिक शास्त्रे संशोधन पद्धतीपैकी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक ऐतिहासिक व अन्वेषणात्मक पद्धतीचा अवलंब केला आहे.

शोधन पद्धतीची स्तोत्र :-

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. अभ्यासक्रम पुस्तके इंटरनेट इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

गृहितके:-

१) भारतीय समाजात महिलांना दुय्यम स्थान होते.

२) भारतीय समाजात अनेक अनिष्ट प्रथा चालू होत्या.

३) भारतीय समाजात जनजागृतीस प्रारंभ झाला.

प्राचीन काळातील महिलांचे स्थान:-

प्राचीन काळातील धर्मग्रंथांमध्ये, अध्यात्मामध्ये, संस्कृतीमध्ये महिलांना आदराचे व सन्मानाचे स्थान देण्यात आले असले तरी, उत्तरवेदकाळात मात्र स्वातंत्र्य, आदराचे स्थान व महत्त्व कमी होत जाण्यास सुरुवात झाली. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार राहिला नाही. पती निवडीचा अधिकार नष्ट झाला होता. समाजात बाल बालविवाहला प्रारंभ झाला होता. तसेच सतीची पद्धत समाजामध्ये सुरू झालेली होती. स्त्रियांना कुटुंबात महत्त्व राहिले नाही. त्याचप्रमाणे सामाजिक व धार्मिक जीवनात स्त्रियांचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत गेले. पती हाच स्त्रीचा परमेश्वर मानण्यात येऊ लागले. विधवा विवाह निषिध्द मानला गेला.विधवा स्त्रीने संन्यास्तवृत्तीने जीवन जगावे उंची वस्त्रे व अलंकार परिधान करण्यास निर्बंध घालण्यात आले होते. अशा प्रकारे स्त्रियांची अवस्था या काळामध्ये अत्यंत दयनीय स्वरूपाची झालेली होती.

* शिव काळातील महिलांचे स्थान :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात महिलांना मानसन्मान होता. तर राजघराण्यातील व सरदार घराण्यातील महिलांना लेखन वाचन आणि शिक्षणाच्या संधी होत्या.

* पेशवे काळातील महिलांचे स्थान :-

पेशव्यांच्या काळात महिलांना अत्यंत दयनीय अवस्थेत जीवन व्यतीत करावे लागत असल्याचे दिसून येते. कारण रुढी परंपरा धर्माच्या नावाखाली चालणारा स्त्रियांच्या बाबतीत कर्मठपणा, सती प्रथा, बालविवाह,

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

जरठ-कुमारी विवाह, विधवा स्त्रियांची दयनीय स्थिती कुटुंबांतर्गत होणारी घुसमट शारीरिक छळ बलात्कार या सर्व गोष्टींनी महिला गांजलेल्या होत्या. हे सर्व अन्याय व अत्याचार महिला जन्माचे भोग म्हणून मुक्तपणे सहन करत होत्या. शिक्षण नाही, संपत्तीत हक्क नाही, स्वतःचे उत्पन्नाचे कसलेही साधन नाही, अशी दयनीय व लाचार अवस्था या काळात झालेली दिसून येते.

* ब्रिटिशांच्या काळातील महिलांची स्थान :-

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट झालाआणि ब्रिटिशांची सत्ता संपूर्ण भारतभर सुरू झाली. आणि भारतीय समाजामध्ये परिवर्तनास प्रारंभ झाला. सर्वप्रथम महिलांच्या अन्याय अत्याचारास वाचा फोडण्याचे काम राजा राम मोहन रॉय यांनी केलेली दिसून येते. त्यांनी सती प्रथेविरुद्ध भूमिका घेऊन सतीची चाल बंद केली. आर्य समाजाने बालविवाह प्रथा, पडदा प्रथा बंद केली. तसेच १८५६ मध्ये विधवा विवाह पुनर्विवाह अधिनियम, १८७२ ला धनसंपत्ती नियम केला. महिलांच्या दृष्टीने ब्रिटिशांची राजवट खऱ्या अर्थाने एक प्रकारे वरदानच मानली जाते.

*स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचा विकास :-

१५ ऑगस्ट १९४७ भारताला स्वातंत्र्य मिळाले. अशा भारतीय स्वातंत्र्याची राज्यघटना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केली व या राज्यघटनेत महिलांच्या दृष्टिकोनातून अनेक सकारात्मक कायदे करून महिलांना मोठ्या प्रमाणात विकास साधण्याच्या प्रवाहात आणले आज महिला सामाजिक राजकीय आर्थिक क्षेत्रामध्ये पदार्पण करून आपला ठसा उठवत आहेत.

शिक्षणाच्या प्रसारामुळे भारतीय महिलांमध्ये फार मोठ्या प्रमाणात जनजागृती घडून आली आहे. संपत्तीत त्याचप्रमाणे घटस्फोटाच्या संदर्भात वैधानिक अधिकार मिळाल्यामुळे महिलांच्या सामाजिक स्थितीत मोठ्या प्रमाणात बदल घडून आला आहे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुलींच्या बाबतीत भारतीय समाजात वैचारिक परिवर्तन होऊन व्यापक बदल झाला आहे.स्वातंत्र्यानंतर मुलांच्या तुलनेत मुली जास्त क्रियाशील आणि कर्तव्यदक्ष झाल्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीत मोठ्या प्रमाणात बदल घडून आलेला दिसून येतो.

*महिलांचे विविध क्षेत्रातील पदार्पण :-

भारतीय महिलांच्या परिस्थितीमध्ये आमुलाग्र असा बदल झालेला दिसून येत आहे. भारतामध्ये दिवसेंदिवस शैक्षणिक प्रसार घडून येत असल्यामुळे महिलांनी शिक्षण घेऊन शासकीय क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. एवढेच नव्हे तर आजच्या महिलांनी वैज्ञानिक, राजकीय,पत्रकारिता, कवयित्री, डॉक्टर,इंजिनिअर, प्राध्यापक, समाज सुधारक अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपले निर्विवाद वर्चस्व निर्माण केलेले दिसून येत आहे. आर्थिक क्षेत्रातील विभिन्न उद्योग व्यवसायात त्यांनी पदार्पण करून एक वेगळी प्रतिमा निर्माण केलेली दिसून येत आहे.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

अशा अशा प्रकारे महिलांचा आर्थिक सहभाग दिवसेंदिवस गतिशील बनत असून अन्य क्षेत्रात सुद्धा आपले वर्चस्व सिद्ध करून सामाजिक,राजकीय, व्यावसायिक क्षेत्रातील सहभागामुळे त्यांच्या जीवनाला एक प्रकारे स्थैर्य प्राप्त होत असलेली दिसून येत आहे.

* महिलांच्या रक्षणासाठी केलेली कायदे :-

स्वातंत्र्यानंतर महिलांना पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रामध्ये समान संधी मिळावी यासाठी महिलांच्या हक्क आणि अधिकार यांच्या रक्षणासाठी अनेक प्रकारचे कायदे केलेले आहेत.

१) समान मताधिकार कायदा -१९५२

२) वारसा हक्क कायदा -१९५६

३) घटस्फोटाचा कायदा -१९५६

४) विधवा पुनर्विवाह कायदा -१९५६

५) हुंडा प्रतिबंधक कायदा -१९६१

६) बलात्कार प्रतिबंधक कायदा -१९८३

७) समान वेतन कायदा १९७६

अशा प्रकारे महिलांचा विकास घडावा यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने विविध प्रकारचे कायदे केलेले आहेत. त्यामुळे महिलांना संरक्षणाबरोबरच निर्भयतेने जीवन जगण्याच्या परिस्थितीत उत्तरोत्तर यामध्ये सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे.

निष्कर्ष:-

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील महिलांचा विकास या संदर्भामध्ये अभ्यास करत असताना, प्राचीन काळात महिलांना मोठ्या प्रमाणामध्ये जरी सन्मानपूर्वक स्थान असले तरी मध्ययुगीन कालखंडामध्ये या महिलांना दुय्यम प्रतीचे स्थान होते. मोठ्या प्रमाणामध्ये महिलांची दयनीय अवस्था झालेली दिसून येते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फार मोठ्या प्रमाणात महिलांच्या दयनीय अवस्थेमध्ये परिवर्तन आणि विकास घडवून आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये अनेक अशा तरतुदींच्य त्यांना सक्षम बनवलेली दिसून येत आहे.

त्यामुळे महिलांनी अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवलेला दिसून येत आहे. केवळ महिलांचा स्वीकार झालेला नाही तर, या भारत देशाचा सुद्धा विकास झालेला दिसून येत आहे.

संदर्भ:-

१) पारधी आर.एन., भारतीय स्त्री जीवन व कर्तुत्व , वेद मुद्रा प्रकाशन अमरावती, नोव्हेंबर २००५.

२) आपटे ज.रा., भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड प्रकाशन, पुणे,ऑक्टोबर,२००८.

३) खोले विलास (संपा), स्त्री- पुरुष तुलना, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 3, March 2024

४) पाटील पद्मजा व इतर, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००७.

५)लोटेरा.ज., भारतीय घटनात्मकतरतुदी, पिंपळापुरेअँडकंपनी पब्लिशर्स नागपूर, २०१०.

६) पाटील व्हि.बी.,मानवी हक्क,के सागर प्रकाशन, पुणे, २०१४.

७) भिडे जी. एल., प्राचीन भारत, फडके प्रकाशन कोल्हापूर, १९९६.

८) कांबळे नारायण (संपा),राजश्री शाहू: नव्या दिशा नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद,२०१०

९) बोर्डे सुनीता, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, शुभम पब्लिकेशन्स पुणे, २०१०

१०) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मीशास्त्री, ज्योती चरित्र नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए ५ ग्रीन नवी दिल्ली, २००३.

११) हरी नरके (संपा.), शोधाच्या नव्या वाटा महात्मा फुले चरित्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई,१९९८

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

ISSN 2581-9429 IJARSCT